**सं.फौ.ख. क्र.५११/२०२१**
**नितीन वि. शामल**
**नि.क्र.४८ पुढे सुरु.**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.२ ची पुढील सरतपासणी शपथेवर सुरु**
**फिर्यादीतर्फे विधिज्ञ श्री ए. एस. ननावरे -**

मी प्रस्तुत प्रकरणाचे कामी माझे साक्ष शपथपत्र दाखल केले असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझ्या सांगण्यानुसार माझ्या विधिज्ञांनी संगणकीकृत केला असुन तो बरोबर आहे.

२. आरोपी व फिर्यादी यांच्या मध्ये सन २०२० मध्ये व्यवहार झाला होता. सदरचा व्यवहार लेखी स्वरुपात होता. आता मला दस्त यादी निशाणी क्र.३५/३ वरील दिनांक ०३.२.२०२० रोजीचा लेखी करार/पावती दाखवण्यात आला. त्यावर फिर्यादी व आरोपींची सही आहे. तसेच त्यावर माझी सुध्दा साक्षीदार म्हणुन सही आहे. त्यावेळी माझ्यासह विजय विठ्ठल जाधव हे सुध्दा साक्षीदार म्हणुन हजर होते. त्यांनी सुध्दा त्या दस्तावर सही केली होती. मी ती ओळखतो, कारण ती त्यांनी माझ्यासमक्ष केली होती व आमची तोंड ओळख होती. त्यातील मजकुर बरोबर आहे. (यावेळी आरोपी तर्फे विधीज्ञ श्री देवकर यांनी आक्षेप नोंदविला की सदरील दस्तास निशाणी देता येणार नाही कारण तो नोंदणीकृत नाही. तसेच त्यात नमुद असलेली रक्कम ही पाच लाखांच्या घरात आहे. त्यामुळे एवढया मोठया रक्कमेच्या व्यवहाराकरिता झालेला कथीत करार हा नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. यावर फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री ननावरे यांनी असा युक्तीवाद केला की सदरील दस्तानुसार आर्थीक देवाणघेवाणीबाबत करार झालेला आहे व तो तात्पुरत्या कालावधीकरिता होता आणि केवळ लेखी स्वरुपात आरोपीची हमी यावी या उदद्‌शाने तो सर्वसंमतीने करण्यात आला होता. ) आक्षेप व त्यावरील युक्तीवाद यांचा सांगोपांग विचार करता सदरील करार/पावती ही आर्थीक व पैशांच्या स्वरुपाची असल्याचे दिसुन येते. त्यामुळे तिचे स्वरुप बघता आक्षेपास अधीन राहुन सदरील पावतीस **निशाणी क्र.५४** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री ए एन. देवकर</u>**

३. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझे चांगले मित्र आहेत. साक्षीदार सांगतो की

माझी व त्यांची तोंडओळख आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयात येताना त्यांच्या सोबतच आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयात काय साक्ष दयायची याबाबत त्यांनी मला शिकवले आहे.

***प्रकरण पुढील उलटतपासाकरीता तहकुब.***

समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.11.07 13:36:26 +0530

(आर. एम. भेंडे)

दिनांक :- ०६/११/२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वाई